# शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापूर

( महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)

विद्यानगर, जुना पुणे - बेंगलोर महामार्ग, कृषी महाविद्यालयासमोर, कोल्हापूर – ४१६००४

दुरध्वनी क्र. (०२३१)२५२१०३८ फॅक्स क्र. २५२१०१६ gpkolhapur@yahoo.com


## कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालय, नवी दिल्ली, भारत सरकार यांचे उपक्रम अंतर्गत

## दिव्यांग ( अपंग ) व्यक्तींसाठी प्रथम वर्ष २०२०-२१ अभियांत्रिकी पदविका प्रवेश

शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापूर येथे केंद्रशासन पुरस्कृत दिव्यांग (अपंग) प्रशिक्षण योजनेअंतर्गत प्रथम वर्ष पदविका अभियांत्रिकी स्थापत्य - ०५, यंत्र - ०५, विद्युत - ०५, औ.अणुविद्युत - ०५, माहिती तंत्रज्ञान - ०५ अशा एकूण २५ जागेसाठी इयत्ता १० वी पास दिव्यांग (अपंग) विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येणार आहे. सदरहू प्रवेशासाठी दिव्यांग (अपंग) विद्यार्थ्यास एस.एस.सी. परिक्षेत किमान ३५% गुण आवश्यक आहेत. तसेच किमान ४०% दिव्यांग (अपंग) असल्याचा जिल्हा रुग्णालयाचा दाखला असणे आवश्यक आहे. अभ्यासक्रमासाठी प्रवेश हा सामान्य उमेदवारांसाठी तंत्र शिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदविका प्रवेश नियमावली प्रमाणे व संस्थेमध्ये व्ही. आर. सी. मुंबई यांचेमार्फत घेण्यात येणा-या वैद्यकिय चाचणीनुसार देण्यात येईल. या योजने अंतर्गत प्रवेशार्थीस शैक्षणिक फी माफी, मोफत वसतिगृह, भोजन भत्ता,(रु.१०००/-प्रति महिना) पुस्तके व स्टेशनरी साठी भत्ता (रु. ३०००/-प्रति वर्ष) इत्यादी सोयी सवलती केंद्र शासनाच्या नियमानुसार देण्यात येतील.

प्रवेशासाठी दिव्यांग (अपंग) विद्यार्थ्यांनी सामान्य विद्यार्थ्यांसाठी असणा-या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रीयेसाठी ( Online Registration ) www.dtemaharashtra.gov.in या संकेतस्थळावरुन माहिती घेवून अर्ज करावा. सुविधा केंद्राकडुन ( Facilitation center ) देण्यात येणा-या पोचपावतीची दुय्यम प्रत व हस्तलिखित अर्ज आपल्या दुरध्वनी क्रमांकासह प्रत्यक्ष / पोस्टाने / ई मेल द्वारे (civilgpkp@rediffmail.com किंवा gpkolhapur@yahoo.com ) अर्ज भरलेनंतर सात (०७) दिवसाच्या आत शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापूर येथे सादर करावा. **या संस्थेमधे असे अर्ज प्राप्त झालेले इच्छुक दिव्यांग (अपंग) विद्यार्थीच प्रवेशासाठी पात्र राहतील**. या विद्यार्थ्यांनी वैद्यकीय चाचणी व प्रथम फेरी प्रवेश प्रक्रियेसाठी संस्थेत मुळ कागदपत्रे व इतर शुल्क (अंदाजे रू. ३०००/-) सह त्यांच्या दुरध्वनीवर कळविणेत येणा-या दिवशी सकाळी ११.०० वाजता हजर रहावे.

टिप - १. या योजने अंतर्गतच इतर इच्छुक अपंगांसाठी ०३ ते ०६ महिने कालावधीचे मोफत व्यावसायीक प्रशिक्षण वर्गही आयोजीत करणेत येतात. तरी इच्छुक अपंग व्यक्तींनी इच्छित प्रशिक्षण अभ्यासक्रमाच्या नावासह हस्तलिखित अर्ज संस्थेकडे सादर करावेत. प्रशिक्षणार्थींना केंद्र शासनाच्या नियमानुसार प्रवास व प्रशिक्षण भत्ता देण्यात येतो.

अधिक माहितीसाठी प्रा. ए. एन्. देवडे - ९०११०९११४० व श्री.ए. डी. चौगुले ९०२८५२०७८३ यांना दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा किंवा संस्थेमध्ये प्रत्यक्ष येवून भेटावे.

प्राचार्य,

शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापूर